# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ३२९ दिनांक २३/११/२०२१

## ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २२/११/२०२१ रोजी पोलीस उप-आयुक्त, गुन्हे यांना त्यांचे विश्वसनीय बातमीदाराकडुन अशी माहीती मिळाली की, ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बारमध्ये मुली वेटरच्या नावाखाली परवाना नसतांना गाण्याच्या/वाद्याच्या तालावरती अश्लिल नृत्य करीत आहेत.

पोलीस उप-आयुक्त, गुन्हे यांना मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने वपोनि. पाटील व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथक यांनी पंटर पाठवुन माहितीची सत्यता पडताळुन ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बार येथे छापा टाकला असता बारमध्ये गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती मुली नृत्य व अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे चालक/मालक, व्यवस्थापक, कॅशियर व वेटर हे बारमधील मुलींना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असतांना मिळुन आल्याने बार आस्थापनाचे चालक/मालक, व्यवस्थापक, कॅशियर व वेटर यांच्या विरुद्ध पोलीस अंमलदार केशव शिंदे, नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ४०१/२०२१ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम— २०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती. पदमजा बडे, (गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, मसपोनि. तेजश्री शिंदे-भरोसा सेल, पोशि/ ३६६० केशव शिंदे व पोनि श्री. सचिन कोतमिरे, सपोनि श्री नितीन जगताप, मपोउपनि श्रीमती तांबडे, पोना/२१७१ महाकुलकर, चालक पोशि/४००५ काटे सर्व नेम. मिरारोड पोलीस ठाणे यांनी संयुक्तिकरित्या केली आहे.

---ooo---